**उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग,नंदुरबार यांचे कडून**
**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अंतर्गत कलम 11 ची**
**अधिसूचना**

---

क्रमांक भूसंपादन एस.आर.क्र. 09 /2019 मौजे-मळवाण व मेंदीपाडा,ता.नवापूर,जि.नंदुरबार दिनांक- 22/02/2021

---

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आर्णि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30 ) (ज्याचा उल्लेख पुढे उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) च्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना,महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-11/2014/ प्र.क्र. 77/अ-2/दिनांक 19 जानेवारी, 2015 (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोनासाठी, एखादया जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल, आणि

ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांना या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते (ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे.) आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमीनीचे उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक- 38 दिनांक- 13 मार्च 2015 अन्वये सिंचन प्रकल्पाना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यांत आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही, आणि

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी प्रशासक नेमण्याची तरतूद आहे. परंतु सदर प्रकल्पात विस्थापन नाही. तसा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

ज्याअर्थी आता असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू उक्त गट क्रंमाकाच्या अथवा त्याच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीत कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रर्वतनातुन सूट देता येईल.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5)अ नुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 (यात यापुढे त्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आली आहे) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) द्वारे विहित केल्या प्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करीत आहेत.

सदर अधिसूचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदावयाच्या आहेत. त्या अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून 60 दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

उक्त जमिनीचे नकाशे उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणे करीता उपलब्ध आहेत.

## अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

कोरडी मध्यम प्रकल्प ता.नवापूर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या वितरिका क्र.5 साठी आवश्यक खाजगी जमीनीचे संपादन

मौजे - मळवाण व मेंदीपाडा, ता.नवापूर, जि.नंदुरबार

| अ.क्र. | गट नं. | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| मौजे - मळवाण,ता.नवापूर, जि.नंदुरबार | | |
| 1 | 106 | 0.23 |
| 2 | 109/1<br>109/2 | 0.41 |
| | एकुण क्षेत्र | 0.64 |
| अ.क्र. | गट नं. | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
| मौजे - मेंदीपाडा,ता.नवापूर, जि.नंदुरबार | | |
| 1 | 43 | 0.17 |
| 2 | 42 | 0.13 |
| 3 | 41/1 क | 0.16 |
| 4 | 41/2 अ | 0.14 |
| 5 | 31/1 | 0.04 |
| 6 | 33/4 | 0.23 |
| 7 | 34 | 0.20 |
| 8 | 35/1<br>35/2 | 0.42 |
| | एकुण क्षेत्र | 01.49 |
| | एकुण एकंदर क्षेत्र | 02.13 |

## अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबावत विवरण.

**प्रकल्पाचे नाव** : कोरडी मध्यम प्रकल्प ता.नवापूर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची वितरिका क्र.5 साठी आवश्यक खाजगी जमीन मौजे - मळवाण व मेंदीपाडा,ता. नवापूर, जि.नंदुरबार

**प्रकल्पाचे वर्णन** : मौजे - मळवाण व मेंदीपाडा, ता.नवापूर, जि.नंदुरबार येथील जमीनींचे भूसंपादन करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** : शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणे अपेक्षित आहे.

## अनुसूची - तीन

विस्थापन नाही.

## अनुसूची - चार

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. 38 दिनांक 13 मार्च, 2015 अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासुन सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

## अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल : लागू नाही.

(सही)

*वसुमना पंत (भा.प्र.से.)*
**सहाय्यक जिल्हाधिकारी,**
**नंदुरबार भाग, नंदुरबार**